# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १०/०४-२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०१) इतिवृत्त. सोमवार दिनांक १० एप्रिल २००६ रोजी स्थायी समितीची सभा "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ११.०० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरु झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
०२) श्री. खान मुजीब मिर आलम खान
०३) श्री. गवळी रविकांत काशीनाथ,
०४) सौ.दलाल लता श्रीनिवास
०५) श्री.दाभाडे मिलींद यशवंत
०६) श्री.दिलीप नारायण गायकवाड
०७) श्री.पांडे विनायक प्रभाकर
०८) श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
०९) डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
१०) श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
११) श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
१२) श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
१३) श्री.मो. जावेद मो.इसाक
१४) श्री.शिरसाट संजय पांडुरंग
१५) श्री.सावंत मधुकर दामोधर
१६) श्री.हाजी शेरखान अ. रहेमान

**नगर सचिव :** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई कडील शासन निर्णय दिनांक २९ जानेवारी, १९८८ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या सभा कामकाज नियमावलीचे जादा नियमास मंजुरी दिलेली आहे. सदर नियमाचे नियम क्र. ६५ अन्वये महापौर पदाकरीता नामनिर्देशन आणि नेमणूकीबाबतचे नियम स्थायी समितीच्या अध्यक्षाच्या नामनिर्देशनाना आणि निवडणूकीला लागू पडतील अशी तरतूद आहे.या संदर्भात दिनांक १-०४-२००६ चे परिपत्रक क्रमांक न.स./२००६/२०१ अन्वये सर्वांना अवगत केलेले आहे.

महापौर, उपमहापौर पदासाठी निवडणूका घेण्यासंदर्भात दिनांक ११ फेब्रुवारी २००५ रोजी मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणूका घेणे) नियम २००५ हे नियम अंमलात आलेले आहेत. हे नियम सभापती, स्थायी समिती पदाच्या निवडीस लागू पडतील.

स्थायी समिती सभापती पदाचे निवडीसाठी पिठासीन प्राधिकारीच्या संदर्भात २००५ च्या नियमात जी तरतूद आहे ती तरतूद लागु पडेल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (३) अन्वये सभापती हा सदस्य म्हणून असण्याचे बंद झाल्याबरोबर त्याने आपले पद सोडून दिले पाहिजे अशी तरतुद आहे. दि. २२/०३/२००६ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत कलम २० (३) व २० (४) अन्वये स्थायी समितीचे आठ

सदरस्य चिठ्ठया टाकून सोडत पध्दतीने निवृत्त झालेले आहेत. त्यात स्थायी समिती सभापती हे देखिल निवृत्त झालेले आहेत. पिठासीन अधिकारी संदर्भात पुढील प्रमाणे तरतुद आहे.

सुधारीत नियम २००५ अन्वये विद्यमान महापौर किंवा उपमहापौर जे महापौर पदाची निवडणूक लढवित असतील तर त्यांना बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविण्याचा हक्क नसेल म्हणजेच उमेदवाराला पिठासीन अधिकारी होता येणार नाही असे यावरुन स्पष्ट होते. त्यामुळे सभापती पदाचे निवडणूकीसाठी उमेदवारांना पिठासीन अधिकारी म्हणून काम करणे अपेक्षित नाही. अशा परिस्थितीत जेष्ठतम सदस्य त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविल अशी तरतुद आहे. असे स्पष्ट करण्यात येते की, पिठासीन प्राधिकारी यांना निर्णायक मत देण्याचा अधिकार नाही. नियमातील तरतुदीनुसार मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले पालिका सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तिकडून चिठ्ठी काढण्यात येईल ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी असेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे पिठासीन अधिकारी घोषित करतील.

स्थायी समिती सदस्यांमध्ये यापुर्वी दोन वेळा निवडून आलेल्या सदस्यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कावडे साहेबराव राणुबा | जन्मतारीख - वय ५३ वर्षे |
| २) | सौ.लता श्रीनिवास दलाल | जन्मतारीख - वय ५० वर्षे |
| ३) | श्री. मुजीब आलमशाह खान | जन्मतारीख -०७/०७/१९५७ |
| ४) | श्री. संजय शिरसाट | जन्मतारीख -२९/११/१९६१ |
| ५) | श्री. मधुकर सावंत | जन्मतारीख -२४/१२/१९६२ |
| ६) | श्री.मो. जावेद मो. इसाक | जन्मतारीख -०८/०८/१९६४ |
| ७) | डॉ. आशा बिनवडे | जन्मतारीख -२४/१०/१९६६ |
| ८) | श्री. त्र्यंबक तुपे | जन्मतारीख - ०९/०३/१९६८ |

या सभागृहात यापुर्वी एकूण आठ सन्माननीय सदस्य दोन वेळा निवडून आले असून यापैकी वयाने सर्वात जेष्ठ सदस्य श्री. साहेबराव कावडे व सौ. लता दलाल हे दोन्ही स.सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे श्री. संजय शिरसाट यांनी पिठासीन अधिकारी म्हणून काम पहावे अशी त्यांना विनंती करण्यात येते.

**विषय क्र. ०१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ अन्वये स्थायी समिती सभापती या पदावर निवड करणे.

**संवाद :**

**नगर सचिव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक ०१/०४/२००६ रोजी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ अन्वये

निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक ६ एप्रिल २००६ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक ६ एप्रिल २००६ रोजी कार्यालयीन वेळेत स्थायी समिती सभापती पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

१) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
२) श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
३) श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
४) श्री.खान मुजीब मिर आलमखान

(नगर सचिव हे सभापती, स्थायी समिती पदासाठी प्राप्त झालेली नामनिर्देशन पत्रे छाननीसाठी पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करतात.)

**नगरसचिव :** सभापती, स्थायी समिती पदासाठी आता प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येत आहे.

(पिठासीन अधिकारी नगर सचिव यांच्या मदतीने छाननी करतात.)

**पिठासीन अधिकारी :** स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांचे छाननीचे काम पूर्ण झाले असून खालील नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत.

१) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
२) श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
३) श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
४) श्री.खान मुजीब मिर आलमखान

**नगरसचिव :** छाननीत वैध ठरलेल्या नामनिर्देशनातून ज्या उमेदवारांना नामनिर्देशित पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांनी नियम २००५ चे नियम क्र. ६ (३) अन्वये १५ मिनिटांच्या अवधीत पिठासीन अधिकारी यांना लेखी सूचना देवून त्यांना आपली उमेदवारी मागे घेता येईल. आता सभागृहातील घडयाळाप्रमाणे ११.१५ वाजले असून ११.३० वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल.

**पिठासीन अधिकारी :** आता सभागृहातील घडयाळाप्रमाणे ११.३० वाजले असून सभापती पदासाठी, स्थायी समिती पदासाठी विहीत मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेणाऱ्यांची यादी |
|---|---|
| १) | श्री. खान मुजीब मीर आलम खान |
| २) | श्री. तुपे त्रिंबक गणपतराव |

स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे प्राप्त नामनिर्देशनावरील नावांच्या वर्णानुक्रमे लावण्यात आली असून ती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव |
|---|---|
| १) | श्री. दाभाडे मिलींद यशवंत |
| २) | श्री. वैद्य रेणुकादास गणपतराव |

**पीठासीन अधिकारी :** नियम २००५ चे नियम क्र. ७ (३) प्रमाणे हात वर करुन मतांची नोंद घेण्यात येईल. नगर सचिव यांना विनंती की, त्यांनी मतदान प्रक्रीया संबंधीची माहिती सभागृहास द्यावी.

**नगर सचिव :** औरंगाबाद महानगरपालिका शासन मंजूर सभा कामकाज जादा नियमातील नियम क्र. ६५ अन्वये महापौर, उपमहापौर पदाकरीता नामनिर्देशन आणि नेमणूकीचे नियम स्थायी समिती सभापती पदाच्या नामनिर्देशन आणि निवडणूकीला लागू पडतील अशी तरतुद आहे. महापौर, उपमहापौर पदाकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदाच्या निवडणूका घेणे) नियम २००५ दिनांक ११/०२/२००५ पासून अंमलात आलेले आहे तेच नियम सभापती, स्थायी समिती पदासाठी लागू पडतात. या नियमातील मतदान प्रक्रीया संबंधी तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

०१) नियम क्र. ३ (३) च्या तरतुदीप्रमाणे ही बैठक रद्द किंवा तहकूब करता येणार नाही.

०२) नियम क्र. ७ (२) व ७ (३) प्रमाणे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारंची नांवे मा. पिठासीन अधिकारी वर्णानुक्रमाने लावतील व वर्णानुक्रमाने घोषित करतील ज्या उमेदवारांचे नांव पुकारण्यात येईल त्यांचेसाठी प्रथम हात वर करुन मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मतांची नोंद घेण्यात येईल व त्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजुने मत दिले आहे, अशा पालिका सदस्यांचे नांवाची नोंद कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.

०३) नियम क्र. ७ (४) (एक) अन्वये मत देण्यास इच्छूक असलेल्या पालिका सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त वाजवी संधी मा. पीठासीन अधिकारी देतील. आणि

०४) नियम क्र. ७ (४) (दोन) अन्वये ज्याचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा पालिका सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

०५) नियम क्र. ७ (५) च्या तरतुदी प्रमाणे ज्या पालिका सदस्यांनी मतदान केलेले नाही, त्यांची नोंद देखील कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.

०६) नियम क्र. ७ (८) प्रमाणे मते समसमान मिळाल्यास पीठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले पालिका सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तिकडून चिठ्ठी काढण्यात येईल. अशी तरतुद आहे.

०७) नियम क्र. ७ (९) अन्वये ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी असेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे पीठासीन अधिकारी घोषित करतील.

**पीठासीन अधिकारी :** आता वर्णानुक्रमाने उमेदवारांचे नांव घोषित करण्यात येईल. श्री.दाभाडे मिलींद यशवंत यांना ज्यांना मते द्यावयाचे आहे, त्यांनी आपले हात वर करुन मत नोंदवावे. मतदान गणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी श्री.दाभाडे मिलींद यशवंत यांना हात वर करुन मतदान केले, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी.

श्री.दाभाडे मिलींद यशवंत यांना हात वर करुन मतदान केलेल्या स.सदस्यांची नांवे

| अ.क्र. | स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| १) | खान मुजीब मिर आलम खान |
| २) | दाभाडे मिलींद यशवंत |
| ३) | दाभाडे हिम्मतराव साळुबा |
| ४) | मो. जावेद मो. इसाक |
| ५) | हाजी शेर खान अ. रहेमान |

श्री. वैद्य रेणुकादास दत्तोपंत यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे, त्यांनी आपले हात वर करुन मत नोंदवावे. मतदान गणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी श्री. वैद्य रेणुकादास दत्तोपंत यांना हात वर करुन मतदान केले, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी.

श्री. वैद्य रेणुकादास दत्तोपंत यांना हात वर करुन मतदान केलेल्या स.सदस्यांची नांवे

| अ.क्र. | स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| १) | कावडे साहेबराव राणुबा |
| २) | गवळी रविकांत काशीनाथ |
| ३) | सौ. दलाल लता श्रीनिवास |
| ४) | श्री. गायकवाड दिलीप नारायण |
| ५) | डॉ.आशा उत्तमराव बिनवडे |
| ६) | श्री. पांडे विनायक प्रभाकर |
| ७) | श्री. वैद्य रेणुकादास दत्तोपंत |
| ८) | श्री. बमणे पुनमचंद सोनाजी |
| ९) | श्री. शिरसाट संजय पांडूरंग |
| १०) | श्री. सावंत मधुकर दामोधर |
| ११) | श्री तुपे त्रिंबक गणपतराव |

| | |
|---|---|
| मतदानात भाग घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | १६ |
| मतदानात भाग न घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | ०० |
| एकूण हजर असलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | १६ |

| अ.क्र. | उमेदवारांना मिळालेली मते | |
|---|---|---|
| १) | श्री. दाभाडे मिलींद यशवंत | ०५ |
| २) | श्री. वैद्य रेणुकादास दत्तांपंत | ११ |

वरील प्रमाणे झालेल्या मतदानात स्थायी समिती सभापती पदासाठी श्री. वैद्य रेणुकादास दत्तोपंत यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत. त्यांची स्थायी समिती सभापती पदावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ अन्वये वैध रीतीने निवड झाल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत असून त्यांचे अभिनंदन करण्यांत येत आहे.

**ठराव :**

स्थायी समिती सभापती पदासाठी सभागृहात हात वर करुन झालेल्या मतदानात श्री. वैद्य रेणुकादास दत्तोपंत यांना ११ मते व श्री. दाभाडे मिलींद यशवंत यांना ५ मते मिळाली असल्याने श्री. वैद्य रेणुकादास दत्तोपंत यांच्या स्थायी समिती सभापती पदावर बहुमताने झालेल्या निवडीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

( यानंतर श्री. वैद्य रेणुकादास दत्तोपंत हे सभापती पदाचे आसन ग्रहण करतात. यावेळी मा. पीठासीन अधिकारी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात तसेच प्रशासनातर्फे मा. आयुक्त व नगर सचिव पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात.)

यानंतर सन्माननीय सदस्य श्री, संजय शिरसाट, श्री. दिलीप गायकवाड, सौ.लता दलाल, श्री. मुजीब आलमशाह खान, श्री. मिलींद दाभाडे, श्री. रविकान्त गवळी, डॉ. आशा बिनवडे, श्री. त्रिंबक तुपे, श्री. विनायक पांडे इत्यादींनी समायोचित भाषणे केली व मा. सभापतींचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. मा. सभापती आपले मनोगत व्यक्त करतात.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद